पुणे जिल्हा परिषद, पुणे
"शिक्षण विभाग (प्राथमिक)
यशवंतराव चव्हाण भवन"
जा.क्र. जिप/शिक्षण/प्राथ/२/२१/३५४/२००३
पुणे दिनांक:- २० /१० /२००३

प्रति,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
उत्कर्ष इंग्लिश मेडिअम प्राय० स्कूल
२७८ सोलापूर बाजार-पुणे: १

विषय:- इंग्रजी माध्यमाच्या "कायम विनाअनुदान तत्वावरील" शासन मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्याप्रथम/जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणे बाबत. (माध्यम-इंग्रजी)

संदर्भ:- शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस-१००२/(१०००/०२)/प्राशि-३ दिनांक:- १४ जानेवारी २००३.

वरिल विषयासंबंधित आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्याचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम /जादा तुकड्या/वर्ग जून-२००३ पासून सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उत्कर्ष इंग्लिश मेडि० प्राय० स्कूल, सोलापूर बाजार, पुणे-१ | इंग्रजी | इयत्ता दुसरीची दुसरी तुकडी. | नैसर्गिक | | मंजूर/ ~~नामंजूर~~ |

अटी व शर्ती
===========

१) शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायीक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहीजे.
२) सदर शाळेने तुकड्यासाठी सर्व भौतीक सुविधांसह शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करून नेमला पाहीजे.
३) सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहीजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही. याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७) तपासणी अंती एक जरी अट नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करणेत येईल.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पुणे-१ कारिता

प्रत:- माहिती व योग्य त्या कार्यवाहिसाठी रवाना.